<u>प्रेस नोट.</u> दि.०३.०७.२०२४

नांदेड जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई भरती प्रक्रिया दिनांक १९.०६.२०२४ रोजी पासुन पोलीस मुख्यालय, नांदेड येथे सुरु आहे. जे उमेदवार काही कारणास्तव मैदानी चाचणीकरीता उपस्थित राहु शकले नाहीत, अशा उमेदवारांना त्यांनी केलेल्या विनंती अर्जाप्रमाणे यापुर्वीच तारीख वाढवुन देण्यात आली आहे.

दिनांक १९.०६.२०२४ रोजी पासुन जे उमेदवार गैरहजर आहेत व त्यांनी यापुर्वी शारिरीक चाचणीकरीता तारीख वाढुन घेतलेली नाही, अशा गैरहजर उमेदवारांना एक संधी उपलब्ध्द करुन देणेबाबत भरती समितीने निर्णय घेतला असुन, त्यांनी दिनांक ०४.०७.२०२४ रोजी प्रवेशपत्रामधील सुचनेनुसार पोलीस मुख्यालय, नांदेड येथे उपस्थित राहावे. नांदेड जिल्हा पोलीस दलाची भरती प्रक्रियेची **अंतीम** तारीख ०४.०७.२०२४ असल्याने त्यानंतर कोणत्याही सबबीवर शारिरीक चाचणीसाठी संधी देण्यात येणार नाही याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(श्रीकृष्ण कोकाटे)
पोलीस अधीक्षक, नादेड